**प्रेसनोट** **दिनांक- १९/०७/२०१९**

## समर्थ पोलीस स्टेशन पुणे

## जेष्ठ नागरिकास घरात घुसून मारहाण करुन पळून जाणा-या चार आरोपींना समर्थ पोलीसांनी २४ तासात केली अटक

समर्थ पोलीस ठाणे हद्दीमध्ये ५५१ रास्तापेठ पुणे येथे इसम नामे- किरण अनंतराव शिंदे वय ५३ वर्षे हे त्यांचे ८३ वर्षाचे वडिलांसह राहणेस आहेत. त्यांचे राहते घरासमोर येण्याजाण्याचे रोडवर इसम नामे- कुणाल अनिल शिर्के रा. २७४ नानापेठ पुणे हे कुल्फीची हातगाडी लावत होते. त्यामुळे किरण शिंदे व त्यांचे कुटूंबियांना त्यांचे घरात येण्याजाण्यास अडचण व त्रास होत होता म्हणून त्यांनी कुणाल शिर्के यास व त्याचे कुल्फीचे गाडीवर काम करणारे इसम यांना आमचे येण्या जाण्याचे रस्त्यामध्ये हात गाडी लावू नका, ती काढून घ्या असे सांगितले. या गोष्टीचा राग मनात धरून हातगाडीचे मालक कुणाल शिर्के व त्याचे इतर तीन सहकारी यांनी दिनांक-१४/०७/२०१९ रोजी रात्री १२/०० वा. चे सुमारास किरण शिंदे यांचे राहते घरी फोर व्हिलर गाडीने शिंदे यांचे घरी आले. त्यांचे घरात जबरदस्तीने घुसुन शिंदे यांना आणि त्यांचे ८३ वर्षाचे वडीलांना तम्ही़ु माझ्या कामगारांना गाडी का काढण्यास सांगितली असे म्हणून शिवीगाळ करुन हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांचे घराचे दरवाज्याचे नुकसान करुन पळून गेले . किरण शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन समर्थ पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर २०९/२०१९ भादविक कलम ४५२,३२३,५०४, ५०६,४२७,३४ अन्वये प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

पोलीस उप निरीक्षक शिवाजी भोसले व पोशि..सुमीत खुट्टे , पोशि. निलेश साबळे , पोशि. समीर आवळे , पोना. नितीन घोसाळकर व पोना. सुनील घाडगे समर्थ पोलीस ठाणे पुणे यांनी सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान कुल्फी हातगाडी मालक कुणाल शिर्के याचा त्याचे राहते पत्त्यावर जावून शोध घेतला असता तो सदर ठिकाणी मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून गुन्ह्यात अटक केली. त्याचेकडे गुन्ह्यातील फिर्यादी यांना मारहाण करताना असलेले त्याचे इतर तीन सहकारी यांचे बाबात कसून तपास करुन त्यांची नांवे निष्पन्न केली . त्यानुसार १. चेतन दिलीप गोरे २.मंगेश दत्तात्रय दरगुडे व ३.रोहित संजय खेडकर सर्व राहणार कमला नेहरु हॉस्पीटल मागे, मंगळवार पेठ, पुणे यांना त्याचे पत्त्यावर शोध घेतला परंतु ते घरी मिळून आले नाहीत म्हणून पोशि सुमित खुट्टे यांनी लागलीच त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत सदर आरोपीचे ठाव ठिकाण्यांची माहीती मिळवुन वपोनि श्री. बाळकृष्ण कदम व पोनि श्री. विनायक साळुखे यांना कळवुन त्यांचे मार्गदर्शना,खाली तिन्ही आरोपींना शोधून काढून त्यांना २४ तासात ताब्यात घेवून त्यांचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना गुन्ह्यात अटक करुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.